दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • १६८ • RNI : MAHMAR/2023/87818 • मंगळवार, दि.२२ एप्रिल २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

# आ.मूनगंटीवार यांनी बल्लारपूर मतदारसंघातील विकास कामांसाठी घेतली केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट


## विविध रस्ते व पुलांच्या कामांसाठी ना.गडकरी यांनी दिला सकारात्मक प्रतिसाद

## रहदारीला होणारी अडचण आणि अपघात रोखण्यासाठी केली नव्या उड्डाणपुलांची मागणी

**चंद्रपूर (आशिष घुमे)– राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी बल्लारपूर विधानसभा मतदारसंघातील विविध विकासकामांसाठी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री ना. नितीन गडकरी यांची भेट घेतली. आ. मुनगंटीवार यांनी विविध रस्ते व उड्डाणपुलांच्या कामासाठी दिलेल्या निवेदनावर ना. गडकरी यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. तसेच बल्लारपूर विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी आ. मुनगंटीवार यांच्या सदैव पाठिशी असल्याचा विश्वासही दिला.निवेदनामध्ये मूल शहरानजीक असलेल्या रेल्वे ओव्हर ब्रिजचे काम, राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ९३० मूल–चंद्रपूर या राष्ट्रीय महामार्गाच्या दोन्ही बाजूंना आरसीसी काँक्रीट ड्रेन मंजूर करणे, केंद्रीय मार्ग निधीच्या (सेंट्रल रोड फंड) माध्यमातून बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातील विकासकामांना मंजुरी देणे, तसेच कोठारी गावाजवळील २ किमी अपूर्ण रस्त्याचे काम पूर्ण करणे यांचा समावेश आहे.**

चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर तहसीलमध्ये कोठारी गावाजवळील पुलानजीक २ किमी रस्त्याचे अपूर्ण बांधकाम काम पूर्ण करण्याची विनंती आ. मुनगंटीवार यांनी केली. नॅशनल हायवे ३५३ बी बल्लारपूर–आष्टी राष्ट्रीय महामार्गाचे बांधकाम काम पूर्ण झाले आहे. ५ वर्षांचा कालावधीही पूर्ण झाला आहे. या मार्गावरील पुलाजवळ २ किमी रस्त्याचे काम प्रलंबित आहे. या मार्गावर बर्याच ठिकाणी मोठे खड्डे असल्याने रहदारीला गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. तसेच याठिकाणी मोठे अपघातही झाले आहेत. या २ किमी रस्त्याचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी गावकऱ्यांनी संबंधित विभागाकडे अर्ज केला आहे, परंतु आतापर्यंत कार्यवाही झालेली नाही, याकडे आ. मुनगंटीवार यांनी लक्ष वेधले.

त्याचवेळी चंद्रपूर जिल्ह्यातील मुल–चंद्रपूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ९३० वर, केंद्रीय रस्ते निधीतून मुल शहराजवळील रेल्वे ओव्हरब्रिजचे बांधकाम व्हावे, असेही निवेदन त्यांनी ना. गडकरी यांना दिले. मुल शहराजवळील रेल्वे मार्गावरून मोठ्या संख्येने वाहने जातात. तसेच याच मार्गाने मालगाडीचीही वाहतूक होते. त्यामुळे प्रत्येक अर्धा तासाला रेल्वे क्रॉसिंगवर गेट बंद होतो आणि वाहतूक खोळंबते. परिणामी रुग्णांना वेळेत उपचार मिळण्यास अडचणी येतात. शिवाय सरकारी काम करणार्या नागरिकांना आणि विद्यार्थ्यांना वेळेवर पोहोचण्यात बर्याच अडचणींचा सामना करावा लागतो, याकडेही मंत्री महोदयांचे लक्ष वेधण्यात आले.मुल–चंद्रपूर या राष्ट्रीय महामार्गाच्या दोन्ही बाजूंनी अंदाजे ८ किलोमीटरचे आरसीसी काँक्रिट ड्रेन मंजूर करण्याची विनंतीही आ. मुनगंटीवार यांनी केली. हा महामार्ग बल्लारपूर विधानसभा मतदारसंघात आहे. या राष्ट्रीय महामार्गाच्या दोन्ही बाजुंना चंद्रपूर जिल्ह्यातील जानाळा, आगडी, गोंडसावरी, महादवाडी, अजयपूर, चिचपल्ली, वलनी, घंटाचौकी आणि लोहारा ही गावे आहेत. या गावांतर्गत महामार्गाच्या बाजुला जुना अरुंद नाला आहे. हा नाला तुटलेला असल्याने घाण पाण्याचा निचरा होत नाही. रस्त्यांची सुरक्षा आणि नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने या नाल्याच्या पुनर्बांधणीच्या कामाला मंजुरी देण्यात आली आहे. या गावांतर्गत राष्ट्रीय महामार्गाच्या दोन्ही बाजुंना आरसीसी काँक्रीट नाल्याच्या मंजुरीची आवश्यकता आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या राष्ट्रीय महामार्गाच्या डांबरी रोडची रुंदी ७ मीटर आहे. याठिकाणी प्रस्तावित आरसीसी काँक्रीट ड्रेन आणि डांबरी रस्ता अश्या एकूण ४८.०८ कोटी रुपयांच्या खर्चाचे अंदाजपत्रक राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या नागपूर येथील अधिक्षक अभियंत्यांना सादर करण्यात आले आहे. आपण त्यात लक्ष घालून कृपया तातडीने मंजुरी द्यावी, अशी विनंती आ. मुनगंटीवार यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना केली आहे.बल्लारपूर विधानसभा मतदारसंघातील बल्लारपूर, मुल, पोंभुर्णा तालुक्यांमध्ये वेगाने औद्योगिकीकरण सुरू झाले आहे. हे तालुके चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांच्या सीमेलगत आहेत. त्यामुळे रहदारीच्या दृष्टिकोनातून काही रस्त्यांचे व पुलांचे निर्माणकार्य आवश्यक असल्याची बाब आ. मुनगंटीवार यांनी मंत्री महोदयांकडे उपस्थित केली. यामध्ये पोंभुर्णा येथील नागपूर, नागभीड, सिंदेवाही, मुल, खेडी आणि गोंडपिंपरीला जाणाऱ्या रस्त्यावर मोठ्या उड्डाणपुलाची आवश्यकता आहे. तसेच बल्लारपूर तालुक्यांतर्गत किन्ही येथे मोठा उड्डाणपूल व येनबोडी, पळसगाव, किन्ही, इटोली, गिलबिली रस्त्यावर एका छोट्या उड्डाणपुलाची आवश्यकता आहे, असे आ. मुनगंटीवार यांनी निवेदनात म्हटले आहे. मुल तालुक्यातील उमा नदीवर तसेच अंधारी नदीवर देखील एका मोठ्या पुलाचे निर्माण कार्य करावे, असे निवेदन आ. मुनगंटीवार यांनी केंद्रीय मंत्री गडकरी यांना दिले आहे.



# शेतकऱ्यांना मार्गदर्शन मिळवण्यासाठी ‘बांधावरची प्रयोगशाळा’ –हर्षल शिंदे

## हर्षल शिंदे यांच्या मागणीवर निलेश हेलोंडे यांचा सकारात्मक प्रतिसाद

**चंद्रपूर (आशिष घुमे) : आजच्या काळात आधुनिक शेती तंत्रज्ञानाची गरज लक्षात घेऊन शेतकऱ्यांना थेट त्यांच्या बांधावरच मार्गदर्शन मिळावे, यासाठी युवासेनेचे महाराष्ट्र कार्यकारिणी सदस्य हर्षल शिंदे यांनी पुढाकार घेतला आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात ‘बांधावरची प्रयोगशाळा’ सुरू करावी तसेच जिल्हा स्तरावर शेतकऱ्यांसाठी विशेष मार्गदर्शन शिबिरे आयोजित करावीत, अशी मागणी त्यांनी वसंतराव नाईक स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) ॲड. निलेश केशवराव हेलोंडे यांच्याकडे केली होती. या मागणीची गांभीर्याने दखल घेत शासनाच्या वतीने संबंधित अधिकाऱ्यांना कार्यवाहीचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.**



शिंदे यांनी १ एप्रिल २०२५ रोजी दिलेल्या निवेदनात म्हटले होते की, चंद्रपूर जिल्ह्यातील बहुतांश शेतकरी अजूनही पारंपरिक शेती पद्धतीवर अवलंबून आहेत. आधुनिक तंत्रज्ञान, मृदा परीक्षण, सुधारित वाण, पीक संरक्षण आणि जलसंधारण याबाबत तांत्रिक मार्गदर्शनाची मोठी गरज आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या शेतातच मार्गदर्शन मिळावे यासाठी ‘बांधावरची प्रयोगशाळा’ हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला होता.तसेच, या उपक्रमाची माहिती अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचावी यासाठी जिल्हा स्तरावर कृषी तज्ज्ञ, मृदा वैज्ञानिक व अधिकारी यांच्या उपस्थितीत मार्गदर्शन कार्यक्रम घेण्याची विनंती त्यांनी केली होती. या कार्यक्रमात जैविक शेती, ठिबक सिंचन, मृदा आरोग्य, आधुनिक पद्धतीने शेती करणं आणि उत्पादन घेतल्यानंतर बाजार व्यवस्थापन यासारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर माहिती देण्याचा मुद्दा त्यांनी अधोरेखित केला होता.या निवेदनाची दखल घेत ॲड. निलेश हेलोंडे यांनी दिनांक ७ एप्रिल २०२५ रोजी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, चंद्रपूर यांना पत्र पाठवून यासंदर्भात कार्यवाही करून या कार्यालयास अवगत करण्याचे निर्देश दिले आहेत. शिंदे यांच्या या सामाजिक भान असलेल्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.शेती क्षेत्रासाठी हे एक सकारात्मक पाऊल मानले जात असून, शासन स्तरावरून त्वरित प्रतिसाद मिळाल्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. हर्षल शिंदे यांनी मांडलेली ही मागणी प्रत्यक्षात उतरण्यास सुरुवात झाल्यास पारंपरिक शेतीतून आधुनिकतेकडे वाटचाल करणाऱ्या चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

## राज्यस्तर गाठण्याची पहिली पायरी वरोऱ्यात!

# विद्यार्थ्यांना मिळणार बोर्ड गुण व नोकरीसाठी आरक्षणाचा लाभ

## २२ एप्रिलला जिल्हास्तरीय तायक्कांदो स्पर्धा



**वरोरा । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्यातील तायक्कांदोपटूंसाठी सुवर्णसंधी निर्माण झाली असून, २२ एप्रिल २०२५ रोजी आनंद निकेतन महाविद्यालय, आनंदवन, वरोरा येथे जिल्हास्तरीय कॅडेट व जुनिअर तायक्कांदो स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. डिस्ट्रिक्ट तायक्कांदो असोसिएशन ऑफ चंद्रपूर यांच्यातर्फे ही अधिकृत स्पर्धा घेण्यात येणार आहे.

या स्पर्धेतील विजेते खेळाडू नाशिक येथे होणाऱ्या राज्यस्तरीय कुरोगी व पुमसे तायक्कांदो स्पर्धेसाठी निवडले जाणार आहेत. ही अधिकृत मान्यता असलेली स्पर्धा असल्यामुळे सहभागी विद्यार्थ्यांना शालेय बोर्ड परीक्षेत अतिरिक्त गुण, तसेच शासकीय सेवेसाठी ५% आरक्षण याचा लाभ मिळणार आहे.कॅडेट (१२ ते १४ वर्षे) व जुनिअर (१५ ते १७ वर्षे) या दोन गटांमध्ये स्पर्धा होणार असून, जिल्ह्यातील प्रत्येक शाळा, स्पोर्ट्स क्लब आणि प्रशिक्षकांनी आपल्या खेळाडूंना सहभागी करून ही संधी साधावी, असं आवाहन बजरंग वानखडे (सचिव, जिल्हा तायक्कांदो संघटना) यांनी केलं आहे.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी अमन टेमुर्डे, तानाजी बायस्कर, सागर कोहळे, बजरंग वानखडे, आकाश भोयर, सचिन बोधाने, अक्षय हणमंते, मुकेश पांडे, महेश भिवदरे, पंकज चौधरी यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे .

# दिव्यांग असूनही सेवेसाठी अहोरात्र धडपड!

## मंगलाअगडे यांना ‘तालुकास्तरीय आशा स्वयंसेविका पुरस्कार’

**तळोधी (बा) । प्रणय बांगरे**

शरीराने दिव्यांग, पण मनाने अचूक, समाजासाठी झपाटून काम करणाऱ्या मगलाअगडे यांचा आशा स्वयंसेविका पुरस्काराने गौरव करण्यात आला. ग्रामीण रुग्णालय नागभीड व तालुका आरोग्य विभागाच्या संयुक्त विद्यमाने नागभीड येथील रुक्मिणी सांस्कृतिक सभागृहात पार पडलेल्या आशा डे सोहळ्यात त्यांना हा पुरस्कार देण्यात आला.प्रगती दिव्यांग मंच तळोधी (बा.) च्या कोषाध्यक्षा असलेल्या मंगलाताई या स्वतः दिव्यांग असूनही, आरोग्य सेवा व दिव्यांग कल्याणासाठी सातत्याने कार्यरत आहेत. त्यांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल डॉ. अश्विनी काटेखाये (डेंटिस्ट, ग्रामीण रुग्णालय नागभीड) यांच्या हस्ते पुष्पगुच्छ, प्रमाणपत्र व भेटवस्तू प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

कोरोना काळात विशेष सेवा, महिलांचे आरोग्य, दिव्यांगांची नोंदणी, योजनांचा लाभ मिळवून देणे, बालसंगोपन, अंत्योदय योजना, ५% निधी वितरण, गृहकर माफी आदी अनेक क्षेत्रांत त्यांनी भरीव कार्य केले आहे. त्यांचा कार्यकर्तृत्वाचा आलेख प्रेरणादायी असून, शिक्षणाधिकारी पालवे यांनीही त्यांचं विशेष कौतुक करताना त्या समाजासाठी एक बळकटी आहेत, अशी भावना व्यक्त केली.यावेळी गटविकास अधिकारी स्नेहल लाड, वैद्यकीय अधीक्षक डॉ. रवि गावंडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. विनोद मडावी, विस्तार अधिकारी नागदेवते , प्रा. आ. के. तलोधीचे डॉ. तुषार मंडल, डॉ. भक्ती हिवरकर, बीसीएम अरविंद कामडी, महिला व बालकल्याण अधि. शिला गेडाम आदी मान्यवर उपस्थित होते.आशा स्पर्धेत त्यांनी क्षयरोग विषयावर नाटिकेत उत्कृष्ट अभिनय केला, तर बेटी बचाव, बेटी पढाव या संदेशावर रांगोळी साकारत स्वतःचं कलात्मक कौशल्यही दाखवलं.त्यांच्या या यशामुळे प्रगती दिव्यांगमंच व स्थानिक नागरिकांतून प्रचंड अभिमान व्यक्त केला जात आहे. संगीता तुमडे, तुलोपचंद गेडाम, सुनिता मस्के, सरिता खोब्रागडे, विजय ठोंबरे, विजय मेश्राम, जीवन राऊत, वैशाली श्यामकुळे आदी सहकाऱ्यांनी त्यांचं मनःपूर्वक अभिनंदन केलं आहे.



# भर उन्हात आमदार देवराव भोंगळे यांचे वेकोली विरोधात जन आंदोलन

## ९९ प्रकल्पग्रस्तांना मिळणार नोकऱ्या : सास्ती, कोलगांव व पोवणीचे पुणर्वसन होणार: वेकोली प्रशासन नरमले

**राजुरा । प्रतिनिधी**

राजुरा तालुक्यात बल्लारपूर वेकोलीक्षेत्रांतर्गत मोठ्या प्रमाणात खुल्या कोळसा खाणी आहे या कोळसा खाणी करिता अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहित केल्या आहे. मात्र प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मोबदला व नोकऱ्या देताना वेगवेगळ्या कारणाने वेकोलीने शेकडो प्रकरणे प्रलंबित ठेवलेले आहे. यामुळे प्रकल्पग्रस्त शेतकरी वारंवार वेकोली कार्यालयामध्ये चकरा मारून त्रासले आहे. हा विषय आमदार देवराव भोंगळे यांच्या लक्षात येताच वेकोली प्रशासनाला निवेदनाद्वारे समस्या सोडविण्याबाबत निवेदन दिले. समस्या न सोडविल्यास वेकोलीची कोळसा वाहतूक रोखण्याचा इशारा दिला. त्यामुळे वेकोलीने आमदार देवराव भोंगळे यांना नागपूर येथे वेकोलीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत दि. १९ तारखेच्या बैठखीचे निमंत्रण पाठविले. मात्र आमदार भोंगळे यांनी हे अमान्य करीत बैठक बल्लारपूर क्षेत्राच्या मुख्य महाप्रबंधक कार्यालयातच घेण्याचे सांगितले. त्यानुसार (दि. १९) वेकोलीचे डायरेक्टर पर्सनल डॉ. हेमंत पांडे निदेशक कार्मिक स्वतः बल्लारपूर वेकोलि कार्यालयात आले त्यांच्यासोबत मुख्य महाप्रबंधकाच्या उपस्थितीत आमदार भोंगळे यांनी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांसह दुपारी ४ वाजता सुरु केलेली बैठक रात्री १ वाजेपर्यंत सर्व मुद्द्यावर सविस्तर चर्चा केली. यावेळी वेकोलीच्या अधिकाऱ्यांनी लवकरच समस्या मार्गी लावणार असल्याचे सांगितले. रात्री आमदारांसोबत वेकोलिचे वरिष्ठ अधिकारी व मुख्य महाप्रबंधक यांनी स्वतः सास्ती गावात वेकोलिमुळे होणारे प्रदूषण व ब्लास्टिंगमुळे नागरिकांना होणाऱ्या त्रासाची पाहणी केली व यावर योग्य तोडगा काढण्याचे आश्वासन दिले.



वेकोली प्रशासनाला दिलेल्या निवेदनाप्रमाणे (दि. १९) वेकोलिने कोळसा खाणींसाठी अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या आहेत. त्यावेळी कंपनीने शेतकऱ्यांच्या कुटुंबातील सदस्यांना नोकरी देण्याचे आश्वासन दिले होते. तथापि, जमीन अधिग्रहणाच्या अनेक वर्षांनंतरही, अनेक शेतकऱ्यांना अजूनही नोकऱ्या मिळालेल्या नाहीत. यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. यावेळी वेकोलि प्रशासनाला स्पष्टपणे निर्देश देताना सांगितले कि, ज्या शेतकऱ्यांची जमीन कंपनीने संपादित केली आहे. त्यांच्या सदस्यांना तात्काळ नोकऱ्या द्याव्यात. कायद्याच्या नावाखाली कुठेतरी शेतकऱ्यांना नोकऱ्यांपासून वंचित ठेवले जात आहे. बागायती जमिनीसाठी शेतकऱ्यांना मोबदला देऊन त्या शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान करत आहेत. सास्ती, कोलगाव आणि पोवनी गावाचे पुनर्वसन, बाधित बेरोजगारांना नोकऱ्या, जड ब्लास्टिंग थांबवणे आणि शेतकऱ्यांच्या इतर गंभीर समस्येवर त्वरित तोडगा काढण्याचे निर्देश आमदार देवराव भोंगळे यांनी बैठकीत दिले.

निवेदन दिल्याप्रमाणे (दि. २१) रोज सोमवारला माथरा गोवरी रोडवरील वेकोलीच्या क्षेत्रात आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. त्यानुसार सकाळी दहा वाजता प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांसह आमदार देवराव भोंगळे आंदोलन स्थळी जाऊन वेकोलीची वाहतूक बंद केली यावेळी रस्त्याच्या दुतर्फ वेकोलीची कोळसा वाहतूक करणाऱ्या वाहनाच्या रांगा लागल्या होत्या. आंदोलनस्थळी भर उन्हात आमदार आंदोलन करीत असल्याने प्रकल्पग्रस्त शेतकरी मोठ्याप्रमाणात गोळा झाले होते. यावेळी वेकोलीचे मुख्य महाप्रबंधक इलियास हुसेन नागपूर येथिल अधिकाऱ्यांशी झालेल्या बैठकीतील मुद्देनिहाय सकारात्मक माहितीचा निरोप घेऊन स्वतः येऊन प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या मागण्या आमदार भोंगळे साहेबांसोबत झालेल्या चर्चेनुसार दोन महिन्यात पूर्ण करणार असल्याचे सांगितले. ज्या मागण्या वाचून दाखविल्या त्यातील ९९ प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना नोकऱ्या मिळणार असल्याचे संगितले. यावेळी आमदार देवराव भोंगळे यांनी शेतकऱ्यांना मागण्या मान्य आहे काय विचारताच सर्वांनी मान्य असल्याचे सांगत आंदोलन मागे घेतले. यावेळी आमदार भोंगळे यांनी वेकोलि प्रशासनाला ठणकावून संगितले कि, कोणत्याही प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना त्रास होता कामा नये, वेकोलिने आपल्या अखत्यारीत येत असलेले प्रदूषणाचे, पुनर्वसनाचे, रस्त्यावरील धुळीचे यासह सर्व प्रश्न सोडविण्यास संगितले. समस्या न सोडविल्यास पुन्हा रस्त्यावर उतरण्याचा इशारा ही त्यांनी दिला. यावेळी आंदोलनात जिल्हा महामंत्री विवेक बोढे, राजुरा तालुकाध्यक्ष सुनिल उरकुडे, तालुका महामंत्री वामन तुरानकर, दिलीप गिरसावळे, बाळनाथ वडस्कर, माथराचे सरपंच हरिदास झाडे, कोरपना तालुकाध्यक्ष संजय मुसळे, महामंत्री सतीश उपलेंचीवार, शहर अध्यक्ष सुरेश रागीट, शहर महामंत्री मिलिंद देशकर, सचिन डोहे, नितीन वासाडे, भाजयुमो तालुकाध्यक्ष अजय राठोड, महामंत्री आकाश गंधारे, भाजयुमो राजुरा शहरचे प्रफुल घोटेकर, गडचांदूर शहर अध्यक्ष अरुण डोहे, महिला शहर अध्यक्षा माया धोटे, उज्वला जयपूरकर, प्रीती रेकलवार, अल्का जुलमे, लक्ष्मी बिश्वास, ममता केशेत्तीवार, दीपा बोंथला, वैभव पावळे, स्वप्नील पहानपटे, आसिफ सय्यद, मंगल चव्हाण, विनोद नरेन्दुलवार, सचिन भोयर, छबिलाल नाईक, सागर भटपल्लीवार, रामास्वामी रावला, प्रदीप मोरे, राजकुमार भोगा, महेश झाडे, दीपक झाडे, स्वप्नील राजूरकर, सचिन बल्की, श्रीनिवास मंथनवार,रमाकांत निमकर, प्रतिक कावळे, सीणु पंझा, ज्ञानेश्वर लांडे, पोर्णिमा उरकुडे, सुभाष बोनगिरवार, सुभाष रामगिरवार, सुचिता माऊलिकर यांसह प्रकल्पग्रस्त शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### गांधी सागर तलाव खोलीकरणासाठी मागणी

# माजी युवासेना जिल्हाप्रमुख मनीष जेठाणी यांनी सादर केले निवेदन

## निलेश हेलोंडे पाटील यांनी मदतीचे दिले आश्वासन

**वरोरा । प्रतिनिधी**

वरोरा शहराच्या हृदयस्थानी असलेल्या ऐतिहासिक गांधी सागर तलावाचे खोलीकरण लोकसहभागातून करण्यात यावे, यासाठी माजी युवासेना जिल्हाप्रमुख मनीष जेठाणी यांच्या नेतृत्वात गांधी सागर तलाव खोलीकरण कृती समिती तर्फे निवेदन सादर करण्यात आले. हे निवेदन कै. वसंतराव नाईक स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) निलेश हेलोंडे पाटील यांना देण्यात आले असून, त्यांनी या जनहिताच्या उपक्रमाला सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.



सन २०१९ व २०२२ मध्ये लोकसहभागातून तलावात अनुक्रमे ४५००० व ४७००० क्युबिक मीटर गाळ काढण्यात आला होता. त्यामुळे पाणीसाठ्याची क्षमता जवळपास ९.२ कोटी लिटरपर्यंत वाढली होती. मात्र, सध्या तलाव पुन्हा गाळाने भरलेला असून, पावसाचे पाणी साठवण्याची क्षमता मर्यादित झाली आहे. परिणामी, जानेवारी अखेरपर्यंत तलाव कोरडा होतो आणि शहरातील भूगर्भजल पातळी खोलवर जाते.तलावाचे खोलीकरण पुन्हा प्रभावीपणे होण्यासाठी प्रशासनाकडून मशनरी (पोकलँड २०० किंवा त्याहून मोठी), डिझेल व अधिकृत परवानगी मिळावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर निलेश हेलोंडे पाटील यांनी जिल्हाधिकाऱ्यांशी समन्वय साधून आवश्यक पाठपुरावा करणार असल्याचे सांगितले.विशेष म्हणजे काही नागरिकांनी स्वतःच्या यंत्रसामग्रीद्वारे गाळ नेण्याची तयारी दर्शवली आहे. त्यामुळे त्यांना परवानगी दिल्यास अर्थसंकल्पीय भार कमी होईल, असे मत समितीने मांडले.

# गुहा गावच्या उपसरपंच पदी रवींद्र शिंदे यांची बिनविरोध निवड

## ग्रामस्थांनी केले जल्लोषात स्वागत

**राहुरी । प्रतिनिधी**

अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यातील गुहा ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदी रवींद्र शिंदे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. मावळते उपसरपंच रवींद्र उऱ्हे यांनी ठरल्यानुसार राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या पदासाठी बुधवारी दुपारी ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच अरुणाताई ओहोळ यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली. निर्धारित वेळेत रवींद्र शिंदे यांचा एकमेव अर्ज प्राप्त झाल्यामुळे त्यांची निवड बिनविरोध केली गेली.



निवडीच्या वेळी ग्रामपंचायत सदस्य उषाताई चंद्रे, पुनम कोळसे, रवींद्र उऱ्हे, निलेश ओहोळ, शकीला सय्यद आणि रामा बर्डे उपस्थित होते. यावेळी युवा उद्योजक सुजित वाबळे यांनी रवींद्र शिंदे यांच्या निवडीचे स्वागत करून त्यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. माजी खासदार प्रसाद तनपुरे, माजी मंत्री प्राजक्त तनपुरे, प्रेरणा पतसंस्थेचे चेअरमन सुरेश वाबळे यांच्यासह अनेक प्रतिष्ठित व्यक्तींनी शिंदे यांचे अभिनंदन केले.निवडीचा जल्लोष संपूर्ण ग्रामपंचायतीत पाहायला मिळाला. रवींद्र शिंदे यांचा सत्कार करत फटाक्यांच्या आतिषबाजीत ग्रामस्थांनी आनंद व्यक्त केला. याप्रसंगी तंटामुक्तीचे अध्यक्ष अशोक उऱ्हे, माजी सरपंच रामनाथ उऱ्हे, युवा उद्योजक आणि प्रेरणा मल्टीस्टेटचे चेअरमन सुजित वाबळे, रवींद्र डौले, सुनील उऱ्हे, गंगाराम चंद्रे, चंद्रकांत थोरात, शरद बाबळे, संकेत चंद्रे, मुकेश चंद्रे, काका शिंदे, संतोष ओहोळ, राहुल उऱ्हे, मनोज उऱ्हे, एकनाथ शिंदे यांची उपस्थिती होती. रवींद्र शिंदे यांच्या निवडीमुळे गुहा ग्रामपंचायतीला एक नवा दिशा मिळेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

### सभासदांनी दिलेला कौल मान्य करावा!

# आपला पराभव लपविण्यासाठी काही जणांकडून बागलांवर बिनबुडाचे आरोप-चिंतामणी जगताप

**सोलापूर । प्रतिनिधी**

श्री आदिनाथ सह साखर कारखान्याच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काही जणांकडून बागल गटावर बिनबुडाचे आरोप करण्यात आले आहेत. या आरोपांवर प्रतिक्रिया देताना कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती चिंतामणी जगताप यांनी स्पष्ट केले की, सभासदांनी दिलेला कौल सर्वांनी मान्य करावा. काही जण उगाच आपला पराभव लपविण्यासाठी बागल गटावर आरोप करत आहेत. निवडणुकीत बागल गटाचा कसलाही सहभाग नव्हता, आणि निवडणुकीमध्ये गटाने थांबण्याचा निर्णय घेतला होता.जगताप यांनी पुढे सांगितले की, आदिलनाथ कारखान्याच्या अडचणी दूर करण्यासाठी आमच्या नेत्या रश्मी बागल आणि दिग्विजय बागल यांनी मोलाचा सहभाग नोंदवला होता. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते कारखाना सुरू करण्यात मदत केली होती. तेव्हा ७६,००० टन क्रशिंग झाले होते आणि ऊस वाहतूक, तोडणीदारांचे पेमेंटही केले गेले होते. तथापि, नंतर कारखाना सक्षमपणे का चालवू शकला नाही याचे उत्तर तत्कालीन प्रशासक मंडळाने द्यावे.तालुक्यातील शेतकरी सभासदांना गृहीत धरून स्वतःचे अपयश झाकण्यासाठी काही जण सवंग विधाने करत आहेत. सभासदांनी दिलेल्या कौलाचा मान राखावा आणि खरे तर, निवडणुकीपासून अलिप्त असूनही बागल गट या निवडणुकीत ठळकपणे चर्चेत होता. दिग्विजय बागल यांच्या नेतृत्वात तालुक्याने पहिल्यांदाच नेतृत्वाची चुणूक पाहिली आहे, असे सांगत जगताप यांनी विरोधकांना त्यांच्या प्रतिक्रियांवर आत्मपरीक्षण करण्याचा सल्ला दिला. विधानांना किमान परिष्कृत आणि सुसंगत असावे. बिनबुडाच्या आरोपांनी काहीही साधता येणार नाही, असेही जगताप यांनी स्पष्ट केले.



### वन्यजीवांची तहान भागवण्यासाठी पाणवठयात सोडले पाणी

# पारनेर तालुका पत्रकार संघ व संभाजी नगर मित्रमंडळाचा सामाजिक उपक्रम

**पारनेर । सुयश नरसाळे**

उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे पारनेर तालुक्यात वन्य प्राण्यांना पाणीटंचाईचा सामना करावा लागतो आहे. नैसर्गिक जलस्रोत आटल्याने पक्षी व अन्य वन्य प्राणी भटकंती करत आहेत. या परिस्थितीला लक्षात घेत पारनेर तालुका पत्रकार संघ व संभाजीनगर मित्रमंडळाने एक सामाजिक उपक्रम राबविला. वन्यजीव प्राण्यांसाठी एक तास या उपक्रमांतर्गत सिद्धेश्वरवाडी रोड येथील डोंगरभाग परिसरातील पाणवठ्यात पाणी सोडण्यात आले.



सिद्धेश्वरवाडी रोडलगत डोंगर भागात असलेल्या पाणवठ्यात पाच हजार लिटर पाणी सोडण्यात आले. यामुळे परिसरातील मोर, हरिण, लांडोर आणि लहान मोठ्या पक्षी व वन्यजीव प्राण्यांना पाणी मिळवण्यासाठी भटकंती थांबविण्यात मदत होईल. या उपक्रमाच्या आयोजनात पारनेर तालुका पत्रकार संघाचे पत्रकार विनोद गोळे, संतोष सोबले, तसेच संभाजीनगर मित्रमंडळाचे नियाज राजे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक शंकर नगरे, सतीश भालेकर, रमीज राजे, सुनील गाडगे, बाळासाहेब शेटे, ॲड. सचिन पठारे, योगेश गंधाडे, इम्रान शेख, आवेज राजे, महेश ठुबे, जुनेद राजे, अक्षय फंड, शुभम रेपाळे, सोहेल शेख, रयान राजे आणि पत्रकार भगवान गायकवाड यांसह अनेक वन्यप्रेमी उपस्थित होते.एप्रिल महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात उष्णतेचा पारा वर चढल्याने वन्यप्राण्यांना पाणी मिळवण्यासाठी अनेक ठिकाणी भटकंती करावी लागत आहे. परिसरातील विहिरी, कूपनलिका, ओढे, नाल्यांची पाणीपातळी खूपच कमी झाली आहे. या परिस्थितीला तोंड देताना वन्यप्राण्यांना काही प्रमाणात आराम मिळवण्यासाठी ही छोटीशी मदत झाली आहे.सिद्धेश्वरवाडी रोडवरील पाणवठ्यात पाणी सोडून वन्यजीवांचे जीवन वाचवण्याचा हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा ठरला असून, परिसरातील वन्यजीवांची भटकंती कमी होईल, अशी आशा व्यक्त करण्यात येत आहे.

# होम मिनिस्टर कार्यक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**गंगाखेड । प्रतिनिधी**

नागवंशी सेवाभावी संस्था यांच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून २० एप्रिल रोजी शहरातील डॉ. आंबेडकर नगर येथील बुद्ध विहारमध्ये होम मिनिस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन मिथिलेश केंद्रे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नगरसेवक विशाल साळवे, राहुल गायकवाड, आयोजक सुरेश साळवे, कोमल साळवे, सुनीता घाडगे, लक्ष्मीबाई आडे, कौशल्यबाई कांबळे, शांताबाई साळवे, कमलबाई साळवे, लक्ष्मीबाई साळवे, त्रिशलाबाई साळवे, अनुराधाबाई साळवे यांची उपस्थिती होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर आणि इतर ठिकाणांहून महिलांनी या स्पर्धेमध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. वेगवेगळ्या गटातून स्पर्धा घेतल्या गेल्या आणि अंतिम गटात प्रवेश मिळवलेल्या महिलांना प्रथम, द्वितीय, तृतीय पुरस्कार प्राप्त झाले. सहभागी महिलांनी आनंद व्यक्त करीत या स्पर्धेचा आनंद लुटला.स्पर्धेचे पारितोषिक वितरण याप्रमाणे झाले. प्रथम पारितोषिक रेफ्रिजरेटर नगरसेवक राजकुमार त्र्यंबक सावंत यांच्या वतीने, दुसरे पारितोषिक ड्रेसिंग टेबल सुरेश साळवे यांच्या वतीने, तिसरे पारितोषिक कोमल सुरेश साळवे यांच्या वतीने देण्यात आले. स्पर्धेमध्ये प्रियंका गुणवंत कांबळे यांनी प्रथम क्रमांक, सुजाता प्रवीण कांबळे यांनी द्वितीय क्रमांक आणि भाग्यश्री संतोष हनवते यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला.स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी राहुल जगतकर, विजयकुमार मस्के, बाळू साळवे, गौतम सावंत, सुनील सावंत, राहुल गायकवाड, शंकर साबळे, अतिश साळवे, बबलू साळवे, नवनाथ साळवे, विष्णू साळवे, राज साळवे, धनु साळवे, आनंद साळवे, अतुल साबळे, संविधान साळवे आणि डॉ. आंबेडकर नगर येथील मित्र मंडळ यांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले.



## पुलगाव-विजयगोपाल शिरपूर मार्ग देत आहे अपघाताला आमंत्रण

# आमदार बकाने यांनी निवडून आल्यावर दुरुस्तीचे दिले होते जनतेला आश्वासन

## ठीक ठिकाणी भगदाड पडल्याने रस्त्यात खड्डा की खड्ड्यात रस्ता?

**पुलगाव । प्रतिनिधी**

पुलगाव ते विजयगोपाल तसेच शिरपूर दरम्यानचा मुख्य रस्ता आज अक्षरशः अपघाताला आमंत्रण देत आहे. या मार्गावर अनेक ठिकाणी मोठमोठी भगदाडं पडली असून, रस्ता उखडून खड्ड्यांत रूपांतरित झाला आहे. त्यामुळे प्रवासी तसेच वाहनधारकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.गेल्या विधानसभा निवडणुकीत हा रस्ता एक प्रमुख प्रचार मुद्दा ठरला होता. भारतीय जनता पक्षाचे उमेदवार आणि विद्यमान आमदार राजेश बकाने यांनी निवडून आल्यास या रस्त्याचे डांबरीकरण आणि संपूर्ण दुरुस्ती करण्याचे जनतेला जाहीर आश्वासन दिले होते. मात्र, निवडणुकीनंतर जवळपास पाच वर्षे उलटूनही रस्त्याची अवस्था पूर्ववतच राहिली आहे.

या मार्गावरून दररोज प्रवास करणाऱ्या खातखेडा, ऐआंबा, इंझाळा, घोडेगाव, कोळणा, विजयगोपाल, शेंद्री, सोनोरा ढोक, तांबा, हिवरा कावरे, चौंडी, बाभुळगाव, कांदेगाव, शिरपूर होरे, आणि हिरापुर येथील नागरिकांना खड्ड्यांमुळे प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. एकेकाळी ३० मिनिटांत पार होणारा प्रवास आता एक तासाहून अधिक वेळ घेत आहे.या रस्त्याने प्रवास करताना वाहन चालवणाऱ्यांना अपघाताची भीती कायम जाणवत आहे. खड्ड्यांमुळे अनेकांना पाठीचा व कमरेचा त्रासही सुरू झाला आहे. 'रस्त्यात खड्डा की खड्ड्यात रस्ता' अशी उपरोधिक टीका आता सामान्य नागरिक करत आहेत.या भागातील नागरिक आता आमदार बकाने यांनी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता कधी होणार, याकडे आशेने पाहत आहेत. जर लवकरच रस्त्याची डागडुजी व डांबरीकरणाचे काम हाती घेतले नाही, तर जनतेतून रोष व्यक्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही.



## SBI 'सुरक्षित जिओ आणि जीवन द्या' अभियानाअंतर्गत रक्तदान शिबिराचे आयोजन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

भारतीय स्टेट बँक शाखा हळदा आणि हनुमान मंदिर समिती, हळदा यांच्या संयुक्त विद्यमाने 'सुरक्षित जिओ आणि जीवन द्या' या अभियानांतर्गत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. हे शिबिर भारतीय स्टेट बँकेच्या हालमध्ये पार पडले.

शिबिराचे उद्घाटन अमितसिंह गहेरवार (शाखा प्रबंधक,डइख हळदा) आणि डॉ.सचिन कारंजेकर (गडचिरोली) यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिरात एकूण १३ तरुणांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले.या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी चारूदत्त राऊत (आरमोरी), राकेश धानोरकर, विलास राऊत,शांताराम राऊत, अतुल बोदेले,प्रभुदास जरूरकर,नयना मुलकर,मंगला आवारी,भारती नरुले आणि ज्ञानेश्वर झरकर यांनी मोलाचे सहकार्य केले.शिबिरात सहभागी सर्व रक्तदात्यांना प्रमाणपत्र आणि रोपटी भेट म्हणून देण्यात आली. या शिबिराकरिता जिल्हा रुग्णालय गडचिरोलीच्या वैद्यकीय टीमने विशेष सहकार्य केले.




## बँक ऑफ इंडिया नाचणगाव शाखेच्या जागा बदल प्रस्तावावर नागरिक व व्यापाऱ्यांचा आक्षेप

**पुलगाव । प्रतिनिधी**

नाचणगाव येथील बँक ऑफ इंडिया शाखेने शहराच्या मुख्य ठिकाणी असलेल्या बाजार चौकातील जागा बदलण्याच्या हालचाली सुरू केल्याचे लक्षात येताच व्यापारी आणि नागरिकांमध्ये चिंता पसरली आहे. याबाबत जागा बदलण्याचे कारण स्पष्ट करण्यासाठी बँक ऑफ इंडिया नाचणगाव शाखा व वर्धा येथील विभागीय कार्यालय यांना निवेदन देण्यात आले आहे.बाजार चौकातील पंकज श्रीश्रीमाल, श्याम टावरी, संजय पुरोहित यांच्या जागा नाकारून तुकडोजी चौकातील सोरते यांची जागा मंजूर झाल्याच्या चर्चा सध्या परिसरात सुरू आहेत. तसेच, शांतीनाथ दिगंबर जैन मंदिराची जागा नाकारण्यामागचे कारण काय, याची माहिती देण्यात यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.या निवेदनप्रसंगी शांतीनाथ दिगंबर जैन मंदिराचे अध्यक्ष दीपक काळे, सतीश बोरसे (पाटील तालुकाध्यक्ष ठाकरे गट), सुरेश हनुमंते, शेख अखिल (अल्पसंख्यांक प्रतिनिधी), देवी मंदिराचे अध्यक्ष किरण महाजन, संतोष परसोले, नंदू नांदेकर, नरेश हनुमंते आदी मान्यवर उपस्थित होते.या निर्णयामुळे बाजार चौकातील व्यापाऱ्यांचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता असून, बँक प्रशासनाने निर्णय घेताना जनतेच्या हिताचा विचार करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.



## कॅप्टन मोहन गुजरकर यांची 'शिबिर प्रमुख' म्हणून निवड

### रोव्हर स्काऊट लीडर प्रशिक्षण शिबिरात महत्वाची जबाबदारी

**वर्धा । प्रतिनिधी**

रोव्हर स्काऊटचे जिल्हा आयुक्त तसेच सहाय्यक लिडर ट्रेनर असलेल्या कॅप्टन मोहन गुजरकर यांची महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट आणि गाईडच्या वतीने 'शिबिर प्रमुख' म्हणून निवड करण्यात आली आहे. हे शिबिर पुणे येथे २१ एप्रिल ते २७ एप्रिल दरम्यान आयोजित करण्यात आले असून, पुणे व अहमदनगर जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यालयीन व अध्यापक विद्यालयातील प्राध्यापकांना रोव्हर स्काऊट लीडरचे प्राथमिक प्रशिक्षण दिले जाणार आहे. या प्रशिक्षण शिबिराचा उद्देश महाविद्यालयीन स्तरावर स्काऊट चळवळीला बळकटी देण्याचा असून, साहसी खेळ, नागरी सुरक्षा, युवा चळवळ आणि स्काऊट अभ्यासक्रम यावर विशेष भर दिला जाणार आहे. कॅप्टन मोहन गुजरकर हे स्काऊट चळवळीतील एकमेव लिडर ट्रेनर असून त्यांनी यापूर्वी ठाणे, नाशिक व विदर्भात यशस्वीरीत्या प्रशिक्षण घेतले आहे. ते सध्या एनसीसी अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी आणि होमगार्डचे जिल्हा समादेशक म्हणूनही कार्यरत आहेत. त्यांच्या या निवडीबद्दल सर्वत्र अभिनंदन व्यक्त करण्यात येत आहे.



## फक्त तक्रार नव्हे, समाधानही-शिरूर पोलिसांचा जनतेशी विश्वासाचा करार

# पोलिस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या नेतृत्वात ३५ गहाळ मोबाईल मालकांच्या हाती देणार

**शिरूर । रमेश बनसोडे**

शिरूर तालुक्यातील विविध भागांमधून २०२४ ते २०२५ या कालावधीत गहाळ झालेले किंवा चोरीला गेलेले मोबाईल फोन शिरूर पोलीस स्टेशनने तांत्रिक विश्लेषण आणि सायबर ट्रॅकिंग वापरून शोधले आहेत. या प्रयत्नांना यश मिळवून, पोलीस यंत्रणेला ३५ मोबाईल फोन परत मिळवण्यात यश आले आहे.



या गहाळ मोबाईल फोनच्या मूळ मालकांपर्यंत परतावा करण्यासाठी २१ एप्रिल २०२५ रोजी शिरूर पोलीस स्टेशनमध्ये एक विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सर्व पोलीस कर्मचारी यांच्या उपस्थितीत मोबाईल फोन परत केले जातील.

पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांनी सांगितले की, गहाळ मोबाईल फोन मिळवण्यासाठी नागरिकांनी वेळोवेळी पोलीस स्टेशनमध्ये दाखल केलेल्या तक्रारींची योग्य दखल घेण्यात आली. तांत्रिक पद्धतीने आणि सायबर क्राईम युनिटच्या सहाय्याने हे मोबाईल शोधले गेले. आमचे ध्येय म्हणजे सामान्य नागरिकांना न्याय मिळवून देणे आणि त्यांच्या हरवलेल्या वस्तू परत मिळवून देणे.

याबाबत अधिक माहिती देताना केंजळे यांनी सांगितले की, शिरूर पोलीस प्रशासनाचा मुख्य उद्देश लोकांच्या समस्यांवर लक्ष केंद्रित करून त्यांचं समाधान देणे आहे. हे एक छोटं पण महत्त्वाचं पाऊल आहे ज्यामुळे पोलीस प्रशासनाविषयी जनतेत विश्वास वाढेल,असे ते म्हणाले.पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांचं नेतृत्व आणि मेहनतीमुळे शिरूर पोलिसांनी स्थानिक जनतेला एक नवा विश्वास दिला आहे. या उपक्रमामुळे चोऱ्यांना आळा बसवण्यासाठी जनजागृती होईल आणि नागरिकांचा पोलीस यंत्रणेवरील विश्वास दृढ होईल,असं विश्वास व्यक्त केला जात आहे.सूचना: ज्यांचे मोबाईल गहाळ झाले होते आणि ज्यांनी तक्रारी नोंदवल्या होत्या, त्यांनी आपली ओळख पटवणारे कागदपत्र घेऊन शिरूर पोलीस स्टेशनमध्ये उपस्थित राहावे, असे आवाहन पोलिस निरीक्षक संदेश केंजळे यांनी केले आहे.

## तुळसकर इन्स्टिट्यूटमध्ये पायथॉन प्रोग्रामिंग विषयावर अतिथी व्याख्यान संपन्न

### विद्यार्थ्यांना मिळाले सॉफ्टवेअर क्षेत्रातील व्यावहारिक ज्ञान

**हिंगणघाट । प्रतिनिधी**




विद्या विकास शिक्षण संस्था, हिंगणघाट द्वारा संचालित तुळसकर इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी येथे दि. १७ एप्रिल २०२५ रोजी पायथॉन प्रोग्रामिंगचे बेसिक या विषयावर अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांना संगणक प्रोग्रॅमिंग क्षेत्रातील आधुनिक ज्ञान व तंत्राची ओळख करून देणे हे होते.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्त्या कु. नेहा ठाकूर,सॉफ्टवेअर असोसिएट,असेन्च्युअर इंडिया प्रा.लि.,नागपूर,यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत पायथॉन प्रोग्रॅमिंग लँग्वेजचे महत्त्व आणि भविष्यातील संधी यावर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की,पायथॉन ही आजच्या घडीला सर्वाधिक लोकप्रिय आणि सोपी संगणक भाषा असून,आर्टिफिशियल इंटेलिजन्स,डेटा सायन्स,मशीन लर्निंग अशा अनेक अत्याधुनिक क्षेत्रांमध्ये याचा वापर मोठ्या प्रमाणात होतो.कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राकेश साटोने यांनी कु.नेहा ठाकूर यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले आणि विद्यार्थ्यांना त्यांचा परिचय करून दिला. व्याख्यानानंतर विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना वक्त्यांनी सविस्तर उत्तरे देऊन संवादात्मक वातावरण निर्माण केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापिका जयश्री वैद्य यांनी केले,तर आभार प्रदर्शन प्राध्यापिका श्रद्धा राऊत यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राध्यापिका आचल महाजन यांनी विशेष सहकार्य केले.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना संगणक प्रोग्रॅमिंगच्या क्षेत्रात उपयोगी पडणारे प्राथमिक ज्ञान मिळाले असून,त्यांना भविष्यातील करिअरसाठी दिशा मिळाली आहे,असे उपस्थितांनी सांगितले.

## ब्लेडने वार करून युवकास जखमी-जुन्या वादातून हल्ला

### देवळी येथे बाजारात भाजी विकणाऱ्या पंकज फटिंग यांच्यावर ब्लेड हल्ला

**देवळी । प्रतिनिधी**

देवळी शहरात काल (२० एप्रिल) रात्री ७.३० वाजताच्या सुमारास जुन्या वादातून एक धक्कादायक घटना घडली. वार्ड क्रमांक १३ येथील रहिवासी व भाजीपाल्याचा व्यवसाय करणारे पंकज हरिभाऊ फटिंग (वय ४२) यांच्यावर प्रणय मशानकर याने ब्लेडने वार करून जखमी केले.

पंकज फटिंग हे भिडी येथून भाजीपाल्याची उधारी मागून परत देवळी बसस्टॉपजवळील एका हॉटेलमध्ये बसलेले असताना, प्रणय मशानकर याने तिथे येत जुन्या वादावरून वाद घातला. या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि प्रणय याने जवळ असलेल्या ब्लेडने पंकज फटिंग यांच्या डाव्या हातावर वार करून गंभीर जखमी केले. तसेच त्यांना जीवे मारण्याची धमकीही दिली.सदर प्रकाराची तक्रार पंकज फटिंग यांनी देवळी पोलीस स्टेशनमध्ये दिली असून, पोलिसांनी घटनेची नोंद घेऊन पुढील तपास सुरू केला आहे. काही दिवसांपूर्वीही दोघांमध्ये वाद झाला होता, आणि त्या पूर्वीच्या वादातूनच हा हल्ला घडल्याचे समजते. देवळीतील नागरिकांमध्ये या प्रकारामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, पोलीस प्रशासनाकडून योग्य ती कारवाई होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## चंद्रपूर महाऔष्णिक वसाहतीत जलतरण तलावासाठी नितीन भटारकर यांची मागणी;राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्याकडून सकारात्मक प्रतिसाद

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र हे राज्यातील एक मोठं विज प्रकल्प आहे, आणि इथे २ हजारांहून अधिक कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांचा वावर आहे. यामध्ये सर्व सोयी-सुविधा असल्या तरी एक मोठा अभाव म्हणजे जलतरण तलावाचा आहे. सद्य स्थितीत या वसाहतीच्या १० किमी पर्यंत एकही जलतरण तलाव उपलब्ध नाही. त्यामुळे प्रकल्पातील उच्च अधिकारी, अभियंते आणि कर्मचाऱ्यांसह कुटुंबीयांना पोहण्यासाठी आवश्यक सुविधा मिळत नाहीत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष नितीन भटारकर यांनी यापूर्वी संबंधित अधिकाऱ्यांकडे लेखी निवेदन दिले होते. यापूर्वी, मुख्य अभियंता, चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र यांनी जलतरण तलावाची निर्मिती प्रस्तावित केली होती, परंतु एम.ई.आर.सी. कडून मंजुरी मिळाली नाही.शारिरिकदृष्ट्या फिट राहण्यासाठी पोहण्याचं महत्त्व फार मोठं आहे. कर्मचाऱ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने, या प्रकारच्या सुविधा अत्यंत आवश्यक आहेत. त्यामुळे, चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राने आपल्या निधीतून प्रकल्पाच्या वसाहतीतील उपलब्ध जागेत जलतरण तलाव उभारण्यास मंजुरी देणे आवश्यक आहे. यामुळे वसाहतीतील नागरिकांसह प्रकल्पाच्या परिसरातील अन्य नागरिकांना देखील लाभ होईल.या मागणी संदर्भात नितीन भटारकर यांनी राज्याच्या ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांना भेटून निवेदन दिले. यावेळी राज्यमंत्री बोर्डीकर यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आणि पुढील कार्यवाहीसाठी आश्वासन दिलं.



# मुख्याधिकारी संदीप दोडे यांच्या प्रशासकीय कार्यवाहीला यश; लाड पागे समितीची अंमलबजावणी-सफाई कामगारांना मिळाले न्याय

**मूल | प्रतिनिधी**

नगरपरिषद मुल येथील मुख्याधिकारी संदीप दोडे यांच्या प्रशासकीय कार्यवाहीला यश प्राप्त झाले आहे. लाड पागे समितीच्या अंमलबजावणी संदर्भात दिवंगत सफाई कामगारांच्या वारसदारांना न्याय मिळाला आहे.अखिल भारतीय सफाई मजदूर स्वतंत्र कामगार संघटनेचे महाराष्ट्र प्रदेश सचिव छगन महातो यांनी नगरपरिषद मुल येथील दिवंगत सफाई कामगारांच्या वारसदारांना लाड पागे समितीच्या शिफारशी प्रमाणे सेवेत सामावून घेण्यास शासनाकडे पाठपुरावा केला. त्यानुसार मुख्याधिकारी संदीप दोडे यांनी यशस्वी कार्यवाही केली आणि अर्जदार बाळु भीमराव वाळके, आकाश विश्वनाथ मोटघरे, सदिप घनश्याम वाळके, सुयेश कवडू निमगडे यांना नियुक्ती दिली.

तसेच, रोजंदारी तत्त्वावर काम करणाऱ्या सफाई कामगारांचे वारसदारांना स्थायी नियुक्ती देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. संघटनेचे महाराष्ट्र प्रदेश सचिव छगन महातो यांच्या सोबत एक तास सकारात्मक चर्चा करून पात्र वारसदारांना नियुक्ती देण्याची हमी देण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफलय योजने संदर्भात चर्चा करण्यात आली. २५ वर्षे सेवा केलेल्या सफाई कामगारांच्या प्रस्तावांना त्वरित मंजुरी देण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे उपदान त्वरित देण्यात यावे, अशी मागणी केली गेली.मुल नगर परिषदेत सफाईचे नवीन कंत्राट झाल्यानंतर, राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार, स्थानिक मेहतर, भंगी, डुमार, मखियार यांना कंत्राटामध्ये प्राधान्य देण्यात यावे, असे सांगितले.संगठनच्या वतीने संदीप दोडे, कार्यालय अधीक्षक आसेकर, आणि कार्यालय सहाय्यक उपधीक्षक येनुरकर यांचे सहकार्यही कौतुकास्पद आहे. यावेळी संघटनेचे गडचिरोली जिल्हाध्यक्ष सुभाष महानदे, चंद्रपूर येथील सामाजिक कार्यकर्ते शुभंम कुडाबोर, मुल तालुकाध्यक्ष सदिप पारचे, तसेच सफाई कामगारांचे वारसदार मोनिका मिलिंद मेश्राम, संदेश भगवान खोब्रागडे, सुरेश कवडू निमगडे, मिलिंद नंदकिशोर मेश्राम यांच्यासह अन्य सफाई कामगार बहुसंख्येने उपस्थित होते.सफाई कामगारांच्या कल्याणासाठी घेतलेल्या या निर्णयामुळे मुल नगर परिषद क्षेत्रातील सफाई कामगारांना न्याय मिळालेला आहे, आणि त्यांच्या कार्याची महत्त्वता अधिक रुंदावली आहे.



# येत्या ३ दिवसात नदी काठावरील शेवटच्या गावा पर्यंत पाणी पोहोचेल-आमदार किसनराव वानखेडे

## एसडीओंच्या दालनात तातडीची बैठक संपन्न

**उमरखेड | प्रतिनिधी**

सध्या उमरखेड तालुक्यात पाणीटंचाईची गंभीर समस्या निर्माण झाली आहे, कारण पैनगंगा नदी पात्रात पाणी नसल्यामुळे नदी काठावरील गावांची तसेच जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची स्थिति खूपच बिकट झाली आहे. यावर प्रशासनाने गंभीर दखल घेतली असून, आज २१ एप्रिल रोजी उपविभागीय अधिकारी यांच्या दालनात तातडीची बैठक घेण्यात आली, ज्यात आमदार किसन वानखेडे यांनी सांगितले की, पाणी समस्येचे निवारण लवकरच होईल.पुढे आमदार वानखेडे यांनी सांगितले की, इसापूर धरणाचे पाणी सोडले तरी ते पाणी नदीच्या टेलपर्यंत पोहोचले नाही, ज्यामुळे पाणीटंचाईची समस्या वाढली आहे. यावर उपाययोजना करण्यासाठी एसडीओ कार्यालयात बैठक घेण्यात आली. या बैठकीत उपस्थित अधिकाऱ्यांनी पाणी टेलपर्यंत पोहोचवण्यासाठी आवश्यक पथकांची स्थापना करण्याचा निर्णय घेतला. पाणीप्रवाहातील अडथळे दूर करण्यासाठी बंधारे आणि नाले मोकळे करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.



**पाणी नदीपात्रात सुटले आहे, पण शेवटपर्यंत पोहोचले नाही याची कारणमिमांसा करण्यासाठी बैठक घेण्यात आली. येत्या तीन दिवसात शंभर टक्के पाणी मुरली आणि परोटी गावांपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्व उपाययोजना राबविल्या जातील,असे उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे यांनी सांगितले.–नितिन भुतडा, भाजपा जिल्हा समन्वयक, यवतमाळ व पुसद**

आमदार वानखेडे यांनी प्रशासनाला कडक शब्दांत सांगितले की, पाणी नदी पात्रात सोडले असूनही ते शेवटच्या गावांपर्यंत का पोहोचले नाही, हे शोधून त्यावर त्वरित कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच पाणीटंचाई संदर्भातील कोणतीही तक्रार न येईल याची दक्षता प्रशासनाने घेतली पाहिजे.बैठकीत माजी आमदार विजय खडसे, विनायक राणे, सुदर्शन रावते आणि अन्य अधिकारी उपस्थित होते. त्यांनी ही समस्या सोडवण्यासाठी आवश्यक पावले उचलण्याचा निर्धार केला आहे.

# माजी आमदार संजयमामांची ताकद दिवसें दिवस वाढत आहे, विरोधकांना पोटदुखी!

## संजयमामांच्या पाठीशीच खरा जनाधार–अ‍ॅड.अजित विघन

**सोलापूर | प्रतिनिधी**

करमाळा विधानसभेतील व आदिनाथ कारखाना निवडणुकीत माजी आमदार संजयमामा शिंदे गटाच्या पराभवावर विरोधकांकडून केलेली टिका विजयाच्या उन्मादात केलेली असून, शिंदे गटाचा प्रभाव तालुक्यात दिवसेंदिवस अधिक भक्कम होत आहे, अशी प्रतिक्रिया शिंदे गटाच्या प्रवक्त्या ड. अजित विघने यांनी दिली. त्यांचा असा ठाम विश्वास आहे की, संजयमामांचे जनाधार वाढतच आहे आणि विरोधकांमुळे त्यांचा गट अखेरीस अधिक सशक्त बनेल.



विरोधकांना रोखण्यासाठी तालुक्यातील मोठ्या नेत्यांनी एकत्र येऊन शिंदे गटाच्या विरोधात एक युती केली, पण हा संकुचित संघर्ष दीर्घकाळ टिकणार नाही, असं स्पष्ट सांगणारे ड. विघने यांनी शिंदे गटाच्या वाढत्या जनाधाराचे महत्त्व समजावले. संजयमामांनी विधानसभेतील पराभवातून शिकून, आपल्या कर्मभूमीला प्रगतीकडे नेण्याचे ठरवले असून, त्यांच्या कार्यकर्त्यांना दिलेले संधी हे त्यांचे नेतृत्व व्यक्त करतात.

शिंदे गटाच्या भविष्यातील निवडणुका जोरदार लढवल्या जातील,असे ते म्हणाले. आदिनाथ कारखान्यात जामिनावर असलेल्या गटांना फुकटचे सल्ले देण्याऐवजी, आदिनाथ कारखाना चांगल्या पद्धतीने चालवून शेतकरी सभासद आणि कामगारांना न्याय देण्याच्या दृष्टीने विचार करावा, अशी विनंती त्यांनी केली.त्यांनी पुढे म्हटले की, संजयमामा शिंदे हे नेतृत्वाने पूर्ण सक्षम आहेत आणि त्यांचा गट प्रत्येक निवडणुकीत नवा आत्मविश्वास घेऊन उभा राहील.आदिनाथच्या निवडणुकीत संजयमामांना मिळालेल्या ४१ टक्के मतांवरून ही ताकद स्पष्ट दिसून येते. यावरूनच विरोधकांचे थोडक्यात चुकते लक्ष वेधले.

विरोधकांची चेहरा वाचवायची स्थिती नाही. आदिनाथ कारखाना योग्य रित्या चालवून दाखवा. फुकटचे सल्ले देऊ नका, अशी सूचना प्रवक्ते ड. अजित विघने यांनी विरोधकांना दिली.

## बस थांबत नाही, प्रवाशांचा आक्रोश

# जामखेड आगाराच्या चालक वाहकांच्या चुकीच्या धोरणांचा परिणाम!

**सोलापूर | प्रतिनिधी**

अहिल्या नगर जिल्ह्यातील जामखेड आगाराच्या चालक-वाहकांच्या चुकीच्या धोरणांमुळे प्रवाशांमध्ये संतापाची लाट पसरली आहे. जामखेड आगाराच्या बसेस जामखेड चौकात थांबत नसल्यामुळे शेकडो प्रवाशांना दररोज अडचणींना तोंड द्यावे लागते. करमाळा येथून जामखेड आगाराकडे सतत चालत असलेल्या बसेसमध्ये योग्य थांबे न दिल्याने प्रवासी, विशेषतः महिलांचा आणि विद्यार्थ्यांचा प्रवास अशक्य बनला आहे.



दररोज जामखेड आगाराच्या बसेस करमाळा- जामखेड आणि जामखेड-करमाळा या फेऱ्यांमध्ये वळण घेत असताना, जामखेड चौकात बस थांबवण्याचा त्यांचा नियम न पाळण्याचे संकट नेहमीचाच बनले आहे. बसेस रिकाम्या असतानाही बस थांबवले जात नाहीत आणि महिला वाहक डबल बेल मारून पुढे जाण्याची धमकी देतात.या प्रकारामुळे प्रवाशी वर्गाच्या मनात चिडचिड आणि नाराजी वाढली आहे. विशेषतः विद्यार्थ्यांना आणि वृद्धांना बस थांबत नाहीत, यामुळे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे. तसेच, अनेक वेळा बस थांबवण्यासाठी प्रवासी आडवे जाऊन विरोध करत असतात, जे अपघात होण्याची परिस्थिती निर्माण करतात.

चालक-वाहकांच्या या बेताल वागण्यामुळे जामखेड आगाराचे आर्थिक नुकसान होणार आहे, कारण प्रवासी उपलब्ध असतानाही बस थांबवली जात नाहीत. यावर तातडीने कारवाई केली जावी, अशी मागणी प्रवाशी वर्गातून होत आहे. याबाबत आगार प्रमुख आणि विभाग नियंत्रक यांना योग्य निर्णय घेऊन या वाईट वागण्यावर अंकुश घालण्याची आवश्यकता आहे.जामखेड चौकात प्रवासी प्रत्येक दिवशी थांबण्यासाठी येतात, परंतु जामखेड आगाराच्या बसेस त्या ठिकाणी थांबत नाहीत. अनेक वेळा प्रवासी बसला आडवे जाऊन थांबवण्याचा प्रयत्न करतात, ज्यामुळे अपघात होण्याची शक्यता असते. महिलांना आणि विद्यार्थ्यांना यामुळे अधिक त्रास होतो. या स्थितीला नियंत्रण करण्यासाठी आगार प्रमुखांना तसेच विभाग नियंत्रकांना तातडीने चौकशी करून कारवाई करण्याची मागणी होत आहे.

## रेणाखळी येथे रेणुका वस्तीचे भाग्य उजळणार

# आमदार राजेश विटेकर यांनी दिला १० लक्ष चा निधी



**पाथरी | लक्ष्मण उजगरे**

पाथरी तालुक्यातील रेणाखळी येथील रेणुका वस्तीच्या नागरिकांसाठी मोठा सण ठरला आहे. आमदार राजेशदादा विटेकर यांच्या स्थानिक निधीतून १० लाख रुपयांचा निधी मंजूर करून या वस्तीतील सिमेंट रस्ता व नाली बांधकामाचा शुभारंभ सोमवारी रायुकाँचे प्रदेश सरचिटणीस अजिंक्य नखाते यांच्या हस्ते करण्यात आला. या कामामुळे रेणुका वस्तीचे भाग्य उजळणार आहे, असे स्थानिकांनी म्हटले.

शुभारंभ कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून विठ्ठल थोरात, संदीपान हारकळ, प्रकाश हारकळ, पांडुरंग हारकळ, प्रभू तालडे यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना अजिंक्य नखाते यांनी सांगितले की, रेणाखळी येथील रेणुका वस्तीत रस्ता व नाली बांधकामाची अत्यंत आवश्यकता होती. त्यामुळे आमदार राजेशदादा विटेकर यांनी तत्काळ १० लाख रुपयांचा निधी मंजूर केला. हे काम उच्च दर्जाचे व गुणवत्ता पूर्ण असावे, जेणेकरून भविष्यात येथे कोणतीही समस्या उद्भवणार नाही.नखाते यांनी पुढे सांगितले की, आमदार राजेशदादा विटेकर यांच्या माध्यमातून पाथरी तालुक्यातील विविध विकासकामांना गती मिळाली आहे. माझा प्रयत्न राहील की, तालुक्यातील इतर विकासकामेही लवकर मार्गी लागावीत.रेणुका वस्तीतील ग्रामस्थांनी या कामाच्या शुभारंभाबद्दल आनंद व्यक्त केला असून, त्यांना विश्वास आहे की हे काम वस्तीच्या जीवनमानात सुधारणा करेल.

# रांजणगाव औद्योगिक वसाहतीत बेशिस्त वाहन पार्किंगवरून पोलीस व कंपनी प्रतिनिधींची बैठक संपन्न

**शिरूर | प्रतिनिधी**

रांजणगाव - कारेगाव एमआयडीसी परिसरातील ढोकसांगवी गावाजवळ गेल्या काही वर्षांपासून बेशिस्तपणे उभ्या राहणाऱ्या अवजड वाहनांमुळे अपघातांचे प्रमाण झपाट्याने वाढले आहे. यामुळे स्थानिक लोकांना आणि वाहतुकीस मोठा त्रास होत आहे. या मुद्द्यावर कारवाई करण्यासाठी शुक्रवारी, १८ एप्रिल २०२५ रोजी रांजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशनमध्ये एक महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीचे नेतृत्व पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे यांनी केले, आणि बैठकीला झामील स्टील, बेजल, गृपो अँटोलीन, फियाट, टाटा स्टील अशा कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये यापूर्वी घडलेल्या अपघातांची आणि त्यांची पार्श्वभूमी सांगण्यात आली. १८ फेब्रुवारी २०१८ रोजी झामील स्टील इंडस्ट्रीजच्या नो-पार्किंग क्षेत्रात रिफ्लेक्टर व रेडियम नसलेल्या ट्रकमुळे कैलास चंदर पाचंगे यांचा गंभीर अपघात झाला होता. त्यांना डोक्याला व मेंदूला गंभीर इजा झाली आणि तब्बल १२ लाख रुपयांच्या खर्चात त्यांच्यावर पुण्यात उपचार करण्यात आले. यानंतर अशाच प्रकारचे अनेक अपघात घडले. पाचंगे कुटुंबीयांनी १ सप्टेंबर २०२१ रोजी एमआयडीसीकडे तक्रार दाखल केली, त्यानंतर ६ सप्टेंबर २०२१ रोजी पोलीस स्टेशनला कारवाईचे



निर्देश दिले गेले, परंतु प्रत्यक्षात अपेक्षित कार्यवाही झाली नाही.पुढे, भ्रष्टाचार विरोधी जनआक्रोश मोर्चाचे अध्यक्ष काशिनाथ पाचंगे आणि महिला अध्यक्षा प्रियांका जगताप यांच्या नेतृत्वाखाली या मुद्द्यावर सतत प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले गेले. ०७ जुलै २०२३ आणि ०३ फेब्रुवारी २०२५ रोजी ढोकसांगवी ग्रामसभेत बेशिस्त वाहन पार्किंगविरोधात ठराव संमत केले गेले. मात्र, परिस्थितीत फारसा फरक पडला नाही आणि पाठपुरावा केला गेला.बैठकीत, पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे यांनी संबंधित कंपन्यांना काही महत्त्वाच्या सूचनाही दिल्या. त्यांनी सांगितले की, टाटा चौक ते ढोकसांगवी मार्गावरील अवैध व बेशिस्त वाहन पार्किंगवर कडक कारवाई केली जाईल. प्रत्येक कंपनीने पार्किंग मार्शलची नियुक्ती करावी, तसेच कंपनीच्या गेटपासून काही मीटर अंतर राखून वाहने लावावीत. स्थानिक ग्रामस्थांच्या वाहतुकीस कोणताही अडथळा निर्माण होणार नाही याची खबरदारी घ्यावी.सदस्य काशिनाथ पाचंगे आणि प्रियांका जगताप यांनी बैठक संपल्यानंतर स्पष्ट इशारा दिला की, जर बेशिस्त वाहनचालकांवर कठोर कारवाई झाली नाही, तर आम्हाला आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागेल. रस्ते खुले ठेवणे आणि वाहन चालकांना शिस्त लावणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .